आपलं महानगर | My महानगर.com

# वाघ अभियांत्रिकीत इंडक्शनची सांगता

नाशिक । ए. आय. सी. टी. ई. दिल्ली आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या शैक्षणिक आराखड्यानुसार के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था नाशिक येथे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष बी.टेक. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणाबरोबरच मानवी मूल्ये व जीवनमूल्ये, आरोग्य, समाजाप्रती जबाबदारी यांची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने नोव्हेंबर महिन्यात दहा दिवस "इंडक्शन "कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे ७०० हून अधिक विद्यार्थी व पालक यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सांगता झी सारेगमची स्टार सृष्टी पगारे व मानस गोसावी यांच्या संगीत मैफिलीने झाली.

प्राचार्य डॉ.के.एन.नांदुरकर यांनी संस्थेचे माजी अध्यक्ष कै.बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतींना उजाळा दिला. तसेच संस्थेच्या निरंतर प्रगतीचा इतिहास व त्याचे फलित म्हणून महाविद्यालयाला मिळालेल्या स्वायत्त दर्जाचे महत्व विशद केले. शिक्षणात यशस्वीतेसाठी अभ्यासाबरोबर स्वयंशिस्त आणि सामायिक शिस्त याचे महत्व उपप्राचार्य व प्रशासन विभाग अधिष्ठाता डॉ.एस.एस.साने यांनी विशद केले. महाविद्यालयातून अत्याधुनिक तंत्रज्ञान यासोबतच जागतिक दर्जाचे विद्यार्थी घडविण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी याचा लेखाजोखा विद्यार्थी व्यवहार अधिष्ठाता डॉ. डी. एम.चांदवडकर यांनी मांडला. शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांनी स्वायत्त महाविद्यालयाच्या बी.टेक. अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी आणि मूल्यमापन पद्धतीबद्दल अवगत केले. अंतर्गत गुणवत्ता विभाग अधिष्ठाता डॉ.पी.डी.भामरे यांनी गुणवत्ता वाढीसाठी अतिरिक्त अभ्यास आणि त्यासाठी ऑनलाईन उपलब्ध असलेले काही कोर्सेस बद्दल तर ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ.प्रमोद शहाबादकर यांनी प्लेसमेंट बद्दल माहिती दिली. त्यानंतर यशस्वी माजी विद्यार्थ्यांपैकी कनिष्का ठाकूर, तरल पवार, प्राजक्ता सोमाणी, श्रेया दुदाम आदींनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत समुपदेशक डॉ.प्रतिभा चांडक यांनी संवाद साधला. तसेच दीपाली शिंपी, डॉ. आर.के.मुंजे, प्रा. एस.एस.जोशी, डॉ.के.एस.होळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.विलास पाटील यांनी प्रथमवर्ष कामकाजाच्या नियोजनाचा आढावा घेतला तर डॉ.अनुराधा पवार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा.सुमन कहांडळ, प्रा. रुपाली उन्हाळे, प्रा.संजय भामरे, प्रा.रामेश्वर तुपके व प्रा. स्वाती पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन.नांदुरकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

AaplaMahanagar Edition
Dec 1, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com



नाशिक : वाघ अभियांत्रिकीत सीईओ कनेक्ट उपक्रमाच्या १४ व्या सत्रास उपस्थित उद्योजक राहुल मल्होत्रा, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, व्ही. एस. माने आदी.

## वाघ अभियांत्रिकीत 'सीईओ कनेक्ट'

**नाशिक :** कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) महाराष्ट्र राज्य परिषदेच्या इंडस्ट्री अॅकॅडमिक पॅनलतर्फे के. के. वाघ अभियांत्रिकी येथे ऑनलाइन व ऑफलाईन पद्धतीने सीईओ कनेक्ट हा उपक्रम पार पडला. सीईओ कनेक्टचे हे १४ वे सत्र होते. प्रमुख वक्ते ऐरिस सॉफ्टवेअरचे एमडी व उद्योजक राहुल मल्होत्रा यांनी 'इंटरप्रेनरशिप स्किल अॅन्ड स्टार्टअप फॉर इंजिनिअर' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, डॉ. व्ही. एस. माने, डॉ. आर. मुंजे, डॉ. पी. डी. जाधव, डॉ. पी. जे. पवार आदींसह जवळपास दोनशेहून अधिक विद्यार्थी व प्राध्यापक या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अखेरच्या टप्प्यात प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले. विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी स्वागत केले. महाविद्यालयाचे ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी मार्गदर्शन केले. संगणक विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने यांनी आभार मानले.

# वाघ अभियांत्रिकीत सीआयआयचे सत्र




**पंचवटी** । कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) महाराष्ट्र राज्य परिषदच्या इंडस्ट्री अकॅडमीक पॅनलतर्फे के. के. वाघ अभियांत्रिकी येथे ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने सीईओ कनेक्ट हा उपक्रम पार पडला. सीईओ कनेक्टचे हे १४ वे सत्र होते. अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांना राज्यातील नामवंत उद्योगपतींशी संवाद साधता यावा, हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होय. सत्राचे प्रमुख वक्ते ऐरिस सॉफ्टवेअरचे एमडी व उद्योजक राहुल मल्होत्रा यांनी इंटरप्रेनरशिप स्किल अँड स्टार्टअप फॉर इंजिनिअर या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. महत्त्वाचे म्हणजे राहुल मल्होत्रा हे के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे १९९५ बॅचचे माजी विद्यार्थी आहेत. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, डॉ. व्ही. एस. माने, डॉ. आर. मुंजे, डॉ. पी. डी. जाधव, डॉ. पी. जे. पवार कार्यक्रमास उपस्थित होते. २०० हून अधिक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले आणि सीआयआय विषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. एस. एस. साने यांनी आभार मानले.



नाशिक : प्लेसमेंटमध्ये नोकरी मिळालेल्या के. के. वाघ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापकवर्ग.

## १९ विद्यार्थ्यांना तीन लाखांचे पॅकेज

**नाशिक** : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंटमार्फत एमसीए विभागाच्या १९ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. या विद्यार्थ्यांना सरासरी तीन लाखांचे पॅकेज मिळाल्याने पालकांनी आनंद व्यक्त केला. सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस ड्राइव्हमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली होती. सुरुवातीला प्री-प्लेसमेंट चर्चेद्वारे विद्यार्थ्यांना कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज आदींबाबतची माहिती देण्यात आली. नारोला इन्फोटेक एलएलपी (सुरत) या कंपनीची प्रक्रिया ३ टप्प्यांत पार पडली. त्यात १९ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाल्याची माहिती ट्रेनिंग एड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विभागप्रमुख डॉ. वंदना बागल, ट्रेनिंग एड प्लेसमेंट कोऑर्डिनेटर रूपाली पाटील आदींनी अभिनंदन केले.

**दिव्य मराठी विशेष** • गीतिका कांबळी यांचे सीआयआयच्या आयडब्ल्यूएन सत्रात मार्गदर्शन

## महिलांनी संघर्षाला धैर्याने सामोरे जावे

नाशिक |

महिलांसाठी प्रत्येक दिवस हा एक नवीन संघर्ष घेऊन येत असतो. याप्रसंगी महिलांनी आपली शक्ती ओळखत संघर्षाला धैर्याने सामोरे जायला हवे. तसेच त्यांनी वित्त व उद्योजकता या विषयांचा आवर्जून अभ्यास करावा असे प्रतिपादन महाराष्ट्र सीआयआयच्या चेअरमन गीतिका कांबळी यांनी केले. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (सीआयआय) तर्फे इंडियन वूमन नेटवर्क (आयडब्ल्यूएन) हा उपक्रम के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय येथे नुकतेच चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत महिला आणि




सीआयआयच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना गीतिका कांबळी.

महाविद्यालयीन विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या प्रसंगी सीआयआय, नाशिकचे चेअरमन मनोज देशमुख, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर व विभागप्रमुख उपस्थित होते. तसेच सुमारे १०० विद्यार्थिनी व ५० महिला कर्मचारी उपस्थित होत्या. गुरुगोविंदसिंग कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थिनींनी देखील चर्चा सत्रात सक्रिय सहभाग घेतला. महिला कर्मचारी आणि विद्यार्थिनींना उद्योजकतेला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने इंडियन वूमन नेटवर्कची स्थापना करण्यात आली आहे.

प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविकपर भाषणात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सीआयआयमधील सहभाग विषयी माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय स्वाती पवार यांनी केला. सूत्रसंचालन डॉ. पी. के. शहाबादकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. सीमा गोंधळेकर यांनी केले. प्रा. प्रीती भामरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. स्नेहल चौधरी व प्रा. रूपाली चोथे यांनी काम केले. कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, सचिव प्रा. के. एस बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

Divya Marathi 17-12-2022

# महिलांनी संघर्षाला धैर्याने सामोरे जावे : गीतिका कांबळी

## के. के. वाघ अभियांत्रिकीत सीआयआयच्या आयडब्ल्यूएन सत्राचे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

महिलांसाठी प्रत्येक दिवस हा एक नवीन संघर्ष घेऊन येत असतो. याप्रसंगी महिलांनी आपली शक्ती ओळखत संघर्षाला धैर्याने सामोरे जायला हवे. तसेच त्यांनी वित्त व उद्योजकता या विषयांचा आवर्जून अभ्यास करावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र सीआयआय चेअरमन व मॅनेजिंग पार्टनर फ्युचर फॅक्टरी, मुंबईच्या गीतिका कांबळी यांनी केले.




कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (सीआयआय)तर्फे इंडियन वूमन नेटवर्क (आयडब्ल्यूएन) हा उपक्रम के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय येथे नुकतेच चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत महिला आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सी.आय.आय., नाशिक चेअरमन मनोज देशमुख, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर व विभागप्रमुख उपस्थित होते. तसेच सुमारे १०० विद्यार्थिनी व ५० महिला कर्मचारी उपस्थित होत्या. गुरुगोविंद सिंग कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थिनींनीदेखील चर्चासत्रात सक्रिय सहभाग घेतला.

महिला कर्मचारी आणि विद्यार्थिनींना उद्योजकतेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने इंडियन वूमन नेटवर्कची स्थापना करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविकपर भाषणात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सीआयआयमधील सहभागाविषयी माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय स्वाती पवार यांनी केला. सूत्रसंचालन डॉ. पी. के. शहाबादकर यांनी केले तर आभार प्रा. सीमा गोंधळेकर यांनी मानले. प्रा. प्रीती धामणे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. स्नेहल चौधरी व प्रा. रूपाली चोथे काम केले. संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

**Gavkari- 17-12-2022**

# वाघ अभियांत्रिकीत आयडब्ल्यूएन सत्र

**पंचवटी ।** महिलांसाठी प्रत्येक दिवस हा एक नवीन संघर्ष घेऊन येत असतो.




याप्रसंगी महिलांनी आपली शक्ती ओळखत संघर्षाला धैर्याने सामोरे जायला हवे. तसेच त्यांनी वित्त व उद्योजकता या विषयांचा आवर्जून अभ्यास करावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र सीआयआय चेअरमन व मॅनेजिंग पार्टनर फ्युचर फॅक्टरी, मुंबईच्या गीतिका कांबळी यांनी केले. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (सीआयआय) तर्फे इंडियन वूमन नेटवर्क (आयडब्ल्यूएन) हा उपक्रम केके वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय येथे नुक्तेच चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत महिला आणि महाविद्यालयीन विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले

LOKMAT TIMES

# 'Women should face challenges with courage'



## IWN session of CII held at KK Wagh Engineering College

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, DEC 18

The Indian Women Network (IWN), a Confederation of Indian Industries (CII) initiative, recently hosted a seminar at KK Wagh College of Engineering. Indian Women's Network was founded with the intention of encouraging female students and employees to become entrepreneurs.

Every day brings a new challenge for women. They should realise their strength and confront these challenges with courage. They should also make it a point to study finance and entrepreneurship, said Geetika Kambli, Chairman of CII Maharashtra and Managing Partner of Future Factory in Mumbai. Principal Dr KN Nandurkar, CII, Nashik Chairman Manoj Deshmukh, and the heads of all departments were present. In his welcome speech, Principal Dr KN Nandurkar, mentioned about the association between KK Wagh College of Engineering and CII.

Around 100 students and 50 women employees were also present. The female students of Guru Gobind Singh College of Engineering also actively participated in the seminar.



# K. K. Wagh Education Society



Central Office : Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, Nashik-03
Ph. No. : (0253) 2221109, 2221111, 2221120
Email ID : disp-co@kkwagh.edu.in Website : www.kkwagh.edu.in

**वैशिष्ट्ये :**

- गेली ५० वर्षे गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी संस्था. के.जी.पासून पीएच.डी.पर्यंत विविध शाखांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध.
- अभियांत्रिकी महाविद्यालयातील नऊ (९) शाखांना व तंत्रनिकेतनच्या चार (४) शाखांना NBA, New Delhi कडून मानांकन प्राप्त.
- अभियांत्रिकी महाविद्यालयास NAAC, Banglore द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त.
- सन २०२२-२३ पासून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) नवी दिल्लीकडून अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा (Autonomous Status) प्राप्त.
- रोजगार व उच्च शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणारी संस्था.
- राष्ट्रीय स्तरावरील AICTE-CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास ४ वेळा 'Platinum Category' (सर्वोत्कृष्ट दर्जा) प्राप्त.
- ६ विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी कृषी शिक्षण संस्था.
- अभिजात भारतीय कला जोपासणारी 'ललितकला व प्रयोगजीवी कला शिक्षण' महाविद्यालये.
- विद्यार्थी विकास केंद्रित शिक्षणावर भर देणारी संस्था.
- AICTE - Idea Lab साठी अनुदान मिळवणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय.



**Following new programs have started recently :**

- Artificial Intelligence & Data Science
- Robotics & Automation
- Computer Science & Design in Engineering Institute
- Artificial Intelligence & Machine Learning in Polytechnic
- Diploma in Pharmacy in Degree Pharmacy Institute
- BVA (Painting & Sculpture) in Fine Arts College

दैनिक पुढारी
वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छूक :
श्री. समीर वाघ, अध्यक्ष,
के. के. वाघ शिक्षणसंस्था, नाशिक.
विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक,
शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी

**Constituents of K. K. Wagh Education Society**

Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts |
College of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools

My Nashik Edition
Dec 27, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in



# गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी के. के. वाघ शैक्षणिक संस्था




[illegible]

### कृषी शिक्षणात सर्वात मोठे योगदान

[illegible]

– समीर बाळासाहेब वाघ
अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था

माझी शाळा अशी घडविते जीवन । आत्मनिर्भर देते संस्कारांची शिकवण ॥
Global Vision School

My Nashik Edition
Dec 27, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in